# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.४३ दिनांक १२/०४/२०२१

## स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडुन अवैद्य दारु विक्री करणा-या आरोपीतावर कारवाई

दिनांक १०/०४/२०२१ रोजी १८.०० वाजताचे दरम्यान वाडा पोलीस ठाणे हद्दीत म्हसरोली येथे आरोपीत याने आपले ताब्यात प्रोव्हीबिशन गुन्हयांचा माल विक्री करिता वाहतुक करित असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता यातील एक आरोपीत इसम वय ३० वर्षे यांचे राहते घराचे शेजारी आरोपीत याचे ताबे कब्जात खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुन आला. १)१,२६,३६०/- रु. मॅक्डॉल्स नंबर १ कंपनीच्या ७५० मि.ली. च्या एकुण ४६८ काचेच्या बाटल्या सिलबंद असलेल्या. २)६,१४४/-रु. इम्पेरियल ब्ल्यु कंपनीच्या १८० मि.ली.च्या ३६ बाटल्या सिलबंद असलेल्या ३)६१,५६०/-रु. इम्पेरियल ब्ल्यु कंपनीच्या ७५० मि.ली.च्या एकुण २२८ बाटल्या सिलबंद असलेल्या. ४) ३,००,०००/- रु. किंमतीची पिकअप जीप क्रमांक एम.एच.४८/ए. वाय./९०५६ असा एकुण ४,९४,०६४/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचे आरोपीत यांचे विरुद्ध वाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.III १२३/२०२१ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील अधिक तपास पोहवा.१११६/संतोष हरी निकोळे, हे करित आहेत.

सदरची कारवाई पोनि/रविंद्र नाईक, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक/आशीष पाटील व स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर युनिटचे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.